अधीक्षक अभियंता, महावितरण कार्यालय, ग्रामीण मंडळ औरंगाबाद प्लॉट क्र. जे–१३, गरवारे स्टेडियम समोर, एम.आय.डी.सी. चिकलठाणा, औरंगाबाद या आस्थापनेवर सन २०२१–२२ करिता प्रशिक्षणासाठी शिकाऊ उमेदवारांच्या विजतंत्री – ४५, तारतंत्री–४५, एकुण ९० जागा भरण्यासाठी विजतंत्री/तारतंत्री या व्यवसायात आय. टी. आय. उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी दिनांक १८.११.२०२१ ते दिनांक ०३.१२.२०२१ सायं ५:३० वाजेपर्यंत www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर आस्थापना क्र. E03182700117 वर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. दिनांक ०३.१२.२०२१ नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. **टिप :** अर्ज करावयाची शेवटची तारीख दिनांक ०३.१२.२०२१ रोजी सायं ०५:३० पर्यंतची राहील. उमेदवाराने www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी सर्व संबंधीत कागदपत्रांची (शैक्षणिक प्रमाणपत्र – आयटीआय गुणपत्रक व सनद, एसएससी सनद, जातीचा दाखला, आधारकार्ड, ई.) साक्षांकीत छायांकित प्रत दिनांक ०३.१२.२०२१ पर्यंत महावितरण मंडळ कार्यालय ग्रामीण औरंगाबाद, प्लॉट क्र. जे–१३, गरवारे स्टेडियम समोर, एम.आय.डी.सी. चिकलठाणा, औरंगाबाद येथे प्रत्यक्ष सादर करावी. तसेच शैक्षणिक व इतर कागदपत्रांची साक्षांकीत छायांकित प्रत सादर न करणाऱ्या उमेदवारांच्या ऑनलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही. शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास बदल करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहील.

**पी आर ओ क्र. १२४**

**अधीक्षक अभियंता, महावितरण ग्रामीण मंडल, औरंगाबाद**